**कृपया प्रसिद्धीसाठी** **8 ऑगस्ट 2011**

**काँग्रेसचे अपयश ही भाजपासाठी सुसंधीच : श्री. नितीन गडकरी**

**मुंबई, सोमवार:** ''केंद्रात आणि महाराष्ट्रातही काँग्रेस सरकारचा वाढता भ्रष्टाचार, त्याच बरोबर वारंवार व्यक्त होणारा काँग्रेस नेत्यांचा अहंकार आणि या सर्वांवर मात करणारी महागाई यामुळे जनता संतप्त आहे. भाजपा आमदारांनी या परिस्थितीकडे सुशासन आणण्यासाठी प्राप्त झालेली सुसंधी यादृष्टीने पाहिले पाहिजे. या सुसंधीचे सोने केले पाहिजे'', असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. नितीन गडकरी यांनी पक्षाच्या महाराष्ट्रातील आमदारांना केले. भाजपा आमदारांसाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत आयोजित केलेल्या अभ्यास वर्गाच्या समारोप प्रसंगी रविवारी श्री. गडकरी बोलत होते.

महाराष्ट्र विधानसभा, विधान परिषदेतील भाजपा आमदारांच्या दोन दिवसांच्या अभ्यास वर्गाचा समारोप करताना श्री. गडकरी पुढे म्हणाले,''प्रत्येक भाजपा आमदाराने पुन्हा निवडून येण्यासाठी तसेच पूर्वी पेक्षा अधिक मताधिक्य मिळविण्यासाठी काय केले पाहिजे याचा विचार करावा. मतदार संघात व सभागृहात प्रभावी कामगिरी होईल याकडे येती तीन वर्षे आणखी लक्ष द्यावे. तसे सर्वांनी केले तर महाराष्ट्राचे चित्र निश्चितच बदलेल.''

या अभ्यास वर्गाचे उद्घाटन लोकसभेतील उपनेते खासदार श्री. गोपीनाथ मुंडे यांनी केले. यावेळी देशातील व महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीबाबत त्यांनी आपले विचार मांडले. विधानसभेतील विरोधी पक्ष नेते श्री. एकनाथ खडसे 'सभागृहातील कामात प्रभावी सहभाग' याविषयावर तर, प्रदेशाध्यक्ष आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार 'काँग्रेस आघाडी सरकारचे अपयश' या विषयावर, 'मतदार संघांचे संगोपन' या विषयावर माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक,'जनसंघ - भाजपा विकास यात्रा - हीरक महोत्सवी वर्ष' या विषयावर खासदार श्री. प्रकाश जावडेकर, तर 'संघटनात्मक कार्यात आमदारांचा सहभाग' या विषयावर श्री. रघुनाथ कुलकर्णी यांनी चर्चासत्रे घेतली. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे व आमदार श्री. विनोद तावडे यांनी 'माहिती तंत्रज्ञान, प्रसार माध्यमे' या विषयावर संयुक्त चर्चासत्र घेतले. सदर अभ्यास वर्गाचे संयोजन आमदार श्री. गिरीश बापट यांनी केले, तर अभ्यास वर्गाचे व्यवस्था प्रमुख आमदार श्री. संजय केळकर हे होते.

देशभरातील भाजपाचे लोकसभा-राज्यसभेचे 165 खासदार व 20 राज्यातील 952 आमदारांच्या गुणवत्तेचा विकास व्हावा यासाठी भाजपा खासदार - आमदार विकास प्रकोष्ठ स्थापन करण्यात आला असून माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक त्याचे संयोजक आहेत. या प्रकोष्ठातर्फे सर्व भाजपा खासदारांचे व देशभरात विविध राज्यांमध्ये तेथील आमदारांचे अभ्यास वर्ग घेण्यात येणार आहेत. या प्रकोष्ठाने सर्व प्रथम देशभरातील खासदारांचा दिल्ली येथे प्रशिक्षण वर्ग घेतला. त्यानंतर मध्यप्रदेश व बिहार येथील आमदारांचे प्रशिक्षण वर्ग झाल्यानंतर आता काल महाराष्ट्रातील आमदारांचा प्रशिक्षण वर्ग झाला. नजिकच्या काळात हिमाचल प्रदेश, उत्तराखण्ड, राजस्थान व कर्नाटक येथे प्रशिक्षण वर्ग होणार आहेत, अशी माहिती श्री. राम नाईक यांनी पत्रकाच्या अखेरीस दिली.

**(कार्यालय सचिव)**